International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# आरक्षण :- एक अध्ययन

**Vikas Bhimrao Paikrao**

Research scholars

सारांश :-

आरक्षण म्हणजे काय या शब्दाचे आपण सगळेच परि चत आहोत. आरक्षण म्हटलं की आपल्यासमोर येथे राजकारण.कारण आरक्षणाच्या मूळ मुद्दा बाजूला ठेवून राजकारण दिसत असते आ ण राजकीय नेते सुद्धा आरक्षणाचा मुद्दा उचलून आपली पोळी भाजत असतात.जर आपल्याला आपल्या देशाची समाजाची प्रगती करायची असेल तर आरक्षणाचा उद्देश काय आहे त्याचा अर्थ समजणे आपल्याला आवश्यक आहे भारत देश संघराज्य म्हणून ओळखला जातो. तरी अनेक जातीधर्माचे ,समुदायाचे लोक एकत्र गुण्यागो वंदाने एकत्र राहतात. आरक्षणामुळे अनेक पुढारी कुशल नेतृत्व करणारे नेते आपल्याला लाभले. आ ण त्यांनी सुद्धा आलेल्या संधीचे सोनं करून अ भमानास्पद कार्य दाखवले आहे.परंतु आता आरक्षणाचा चुकीचा आर अर्थ घेऊन काही लोकांनी त्याचा गैरवापर करताना दिसून येत आहे.जर एखाद्या जातीला आरक्षणाची गरज असेल तर तशी मागणी सर्व पक्षांनी एक वचाराने करायची असते कलम 15(4) मध्ये असे नमूद आहे की, सामाजिक आ ण शैक्ष णक दृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी सरकार त्या संदर्भात वशेष तरतूद करू शकतात.

प्रस्तावना :-

एस सी,एस टी , जमातींना जगण्याचे सर्व हक्क मळाले पाहिजे आ ण त्यांनाही न्यायाने जगता आले पाहिजे हा आरक्षण देण्यामागचा हेतू आहे. वैदिक काळामध्ये जात ही बंदिस्त नव्हती खुली व्यवस्था अस्तित्वात होती त्यामध्ये त्यांचे चार वर्णांमध्ये वभाजन केल्या गेले ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्नामध्येच समाज व्यवस्था असल्याचे दिसून येते. आपापल्या कलागुणांच्या आधारे वर्ण बदल करता येत होता परंतु काळानुसार वर्ण व्यवस्था बंदिस्त स्वरूपात बनत गेली आ ण हळूहळू लोकांच्या कामावरून त्याची जात ठरवली जाऊ लागली परंतु आजच्या 21 व्या शतकातील वज्ञान आ ण तंत्रज्ञान युगात इतकी प्रगती झाली की लोकांना आवडीनुसार त्यांना काम मळू लागले. नोकरीच्या समान संधी त्यांना निर्माण झाले आहेत. लोकांना त्यांच्या आवडीनुसार का मळू लागले आ ण एखाद्याची काम करण्याची इच्छा असेल तर त्याला संधी मळालीच पाहिजे जर एखाद्या जातीला कंवा समुदायातील लोकांना आरक्षण असेल त्या समाजातील तरुण पढी नक्कीच शक्षण घेतील न्याय आ ण हक्काच्या स्पर्धेतील नक्कीच तुलनात्मक उन्नती साध्य करू शकतील.

आरक्षणाची संकल्पना :-

आरक्षणाचा मागे समान हक्काचे तत्व असते. आरक्षण ही अशी गोष्ट आहे जिला ''सकारात्मक भेदभाव'' करणारी यंत्र म्हटले जाते. जी एखाद्या समुदायाच्या वरोधात सूड घेण्याची यंत्रणा नाहीत याउलट ज्यांना इतिहासातील सामाजिक परिस्थितीने संधी नाकारली होती. त्यांना समान संधीचे साधन उपलब्ध करून देणारी सोय म्हणजेच आरक्षण आहे. यामध्ये आरक्षणाच्या आ र्थक स्थिती हा मुद्दाच नाही महत्त्वाचा आ ण स्पष्टपणे सांगायचे झाल्यास आरक्षण ही ''गरिबी निर्मूलन'' करणारी योजना नाही. आरक्षणा शब्द ''संरक्षणात्मक वभेधीकरण'' ''रक्षात्मक भेदभाव'' या अर्थाने वापरला जातो[१] अमेरिकेतील निग्रो लोकांसाठी असलेले आरक्षण

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

'रिझर्व डस्क्रि मनेशन' नावाने ओळखला जातो. आरक्षण म्हणजे साध्या भाषेत सांगायचे झाल्यास "जागा राखून ठेवणे" होय आरक्षणासाठी अनेक समाजसुधारकांनी आपल्या भू मका मांडलेल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले. राजश्री शाहू महाराज. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांनी आपली भू मका मांडली महात्मा फुले यांनी तर वर्णव्यवस्था जातीधर्म आ ण अस्पृश्यता नाकारून मानवामध्ये फक्त दोन जाती आहेत एक स्त्री व दुसरे पुरुष असे म्हटले आहे. निसर्गाला जर माणसांमध्ये भेदभाव निर्माण करायचा असता तर सगळे मानव सारखे राहिले नसते असे महात्मा फुले म्हणतात. राजश्री शाहू महाराजांनी जातिव्यवस्था आ ण अस्पृश्यतेला वरोध केला त्याचप्रमाणे देवदासी, सती प्रथा बाल ववाह आदी अनिष्ट प्रथावर बंदी टाकली.26 जुलै 1962 ला मागासवर्गीयांच्या कल्याण करण्यासाठी संस्थानामधील नोकऱ्या 50% राखीव जागा ठेवण्याचा इतिहासामध्ये जाहीरनामा प्र सद्ध जाहीरनामा करून नव्या युगाची सुरुवात केली. महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण संदर्भात आपले नेतृत्व पुढे नेण्याचे कार्य केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द लतांचे, मागासवर्गीयांचे कैवारी उद्धारकर्ते करता म्हटले जाते.

आरक्षणाचा व्याख्या [2] :-

1. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशानुसार "काही अ धकार सत्ता वशेष हक्क इत्यादी संदर्भात व शष्ट कृती अथवा वस्तुस्थिती स्वतःसाठी अथवा दुसऱ्यासाठी राखून ठेवणे म्हणजे आरक्षण होय. (ऑक्सफर्ड डक्शनरी 1972 2506)
2. न्यायमूर्ती के राधास्वामी यांच्या मते,
   'समतेचा मूलभूत अ धकार हा आरक्षणाचा मूलभूत अ धकाऱ्याला मान्यता दिल्या शवाय वास्तवात येऊच शकत नाही"
3. भारतीय समाजाच्या दृष्टिकोनातून आरक्षणाचा वचार केल्यास वं चत दुर्बल शो षत लोकांच्या समूहाला दिली गेलेली वशेष सवलत आहे
4. "सामाजिक भेदभावाच्या ग णत रोखण्याचे एकमेव साधन म्हणजे आरक्षण"
5. "आरक्षण म्हणजे समतेच्या तत्त्वाला प्रत्यक्षात उतरवण्याची व शष्ट संधी होय"

भारतीय सं वधानात आरक्षणाच्या संदर्भात वेगवेगळ्या समूहासाठी तरतुदी केल्याचे दिसून येते त्यामध्ये अँग्लो इं डयन जमात एससी एसटी वशेष तरतूद अँग्लो इं डयन जमात वधानसभा राखीव जागा राखीव नोकरी संदर्भात शैक्ष णक सहायता अनुदान संसदेत व राज्य व धमंडळाचे राखीव जागा राखीव सरकारी नोकऱ्या खास अ धकाऱ्यांच्या नियुक्ती अनुसू चत प्रदेशाची व्यवस्था वन जाती सल्लागार मंडळ आसाम मधील बनण्यासाठी वशेष इत्यादी तरतुदी केल्याचे दिसून येते भारताच्या वेगवेगळ्या भागात आरक्षणाच्या मागणीसाठी अनेक आंदोलने सुरू आहेत त्यामध्ये प्रामुख्याने जात आरक्षण आंदोलन 2016 पटेल कोटा आंदोलन कापू कोटा आंदोलन, गुज्जर आंदोलन, धनगर समाज आंदोलन, इत्यादी आंदोलन झाल्याचे दिसून येते

आरक्षणाकरिता सं वधानानुसार स्थापन करण्यात आलेले व वध आयोग -

१. अनुसू चत जाती करीता राष्ट्रीय आयोग -

राज्यघटनेच्या कलम 338 नुसार स्थापन करण्यात आलेला अनुसू चत जातीसाठी राष्ट्रीय आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. उलटपक्षी राष्ट्रीय महिला आयोग 1992, राष्ट्रीय अल्पसंख्याक 1993, मागासवर्गीयासाठी राष्ट्रीय आयोग 1993, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग 1993, राष्ट्रीय बाल अ धकार संरक्षण

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

आयोग 2007 हे आयोग संसदेच्या कायद्यानुसार स्थापन झाल्या कारणाने त्या केवळ वैधानिक संस्था आहेत[3] अनुसूचित जातीसाठी राष्ट्रीय आयोग ही स्वतंत्र संस्था सन 2004 मध्ये अस्तित्वात आली.यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर तीन सदस्य असतात राष्ट्रपती त्यांच्या अधिकारात त्यांची नियुक्ती करतो त्यांच्या सेवाशर्ती आणि कार्यकालही राष्ट्रपती ठरवतो.

आयोगाचे कार्य पुढीलप्रमाणे :-

1. घटनेच्या कलम 338, 16 व्या भागात 'काही वर्गातसंबंधी विशेष तरतुदी' या मथळ्याखाली हा आयोग नमूद केला आहे.
2. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीसाठी च्या घटकात्मक सुरक्षा उपाययोजना प्रकरण 66 मध्ये विशद केले आहेत
3. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विकासाचा स्तर व ठळक धोरणात्मक मुद्द्यावर सरकारला सल्ला देण्यासाठी या आयोगास राष्ट्रीय स्तरावरील सल्लागार संस्थेचे स्वरूप देण्यात आले
4. हा कायदा 12 मार्च 1992 पासून अंमलात आला
5. नियमानुसार त्यांच्या कार्यकाळात तीन वर्षे असतो.

आयोगाचे अधिकार :-

कोणत्याही बाबीचा तपास करत असताना किंवा कोणत्याही तक्रारीची चौकशी करताना आयोगाला खटला चालविताना दिवाणी न्यायालयात असलेले सर्व अधिकार विशेषत्वाने खालील बाबतीत असतात .

1) भारताच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि शपतीवर त्याची तपासणी करणे

2) कोणतीही कागदपत्र शोधून काढण्यात व सादर करण्याचा आदेश देणे

3) प्रतिज्ञापत्रवर साक्ष देणे

4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदीची कागदपत्रे मागविणे

5) साक्षीदार आणि कागदपत्राच्या परीक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या आदेश देणे

6) राष्ट्रपती ठरवतील त्याप्रमाणे इतर कोणत्याही मुद्दा

अनुसूचित जातीवर परिणाम करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या धोरणात्मक बाबीवर केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी आयोगाची सल्लामसमत करणे आवश्यक आहे.

2. अनुसूचित जमातीसाठी राष्टीय आयोग -

राज्यघटनेच्या कलम 338 ए अनुसार स्थापन करण्यात आलेला अनुसूचित जमातीसाठी चा राष्ट्रीय आयोग ही अनुसूचित जातीच्या राष्ट्रीय आयोगप्रमाणेच घटनात्मक संस्था आहे. सन 1990 च्या 65 व्या घटनादुरुस्ती अधिनियम अनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग अस्तित्वात आला. अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग ही एक स्वतंत्र संस्था सन 2004 मध्ये अस्तित्वात आली यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर तीन सदस्य असतात राष्ट्रपती त्यांच्या अधिकारात त्यांची नियुक्ती करतो त्यांच्या सेवाशर्ती आणि कार्यकाल ही राष्ट्रपती ठरवतो

आयोगाचे कार्य पुढीलप्रमाणे -

1. अनुसू चत जमातीसाठी असलेल्या घटनात्मक व इतर कायदेशीर सुरक्षा उपाययोजना संबंधी सर्व बाबीची चौकशी करणे व त्यावर देखरेख करणे आ ण त्यांच्या कामकाजाची मूल्यमापन करणे.
2. अनुसू चत जमातीसाठीचा सुर क्षततेच्या उपाययोजना व अ धकार यापासून वं चत ठेवणे वषयीच्या व शष्ट तक्रारीची चौकशी करणे.
3. अनुसू चत जमातीच्या सामाजिक आ र्थक वकासाच्या योजना प्र क्रयेत सहभागी होणे व सल्ला देणे आ ण केंद्रात आ ण राज्यात त्यांच्या वकासाच्या वाटचालीची मूल्यमापन करणे.

आयोगाचे अ धकार :-

आपल्या प्र क्रयांची निर्माण करण्याचे आयोगाला अ धकार आहेत

1. जर एखाद्या घटनेची तपासणी करायची असेल आ ण जर आयोगाला त्यासंबंधी चौकशी करायची असेल तर आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अ धकार प्राप्त होतात.
2. भारतातून कोणत्याही भागातील व्यक्तीला आयोगासमोर उपस्थित करण्याचे व अंमलबजावणी करण्याचे अ धकार आहेत.
3. कोणतेही कागदपत्र शोधून काढण्याच्या व साक्ष देण्याचा अथवा आदेश देण्याचा अ धकार आयोगाला आहे.
4. भारताच्या कोणत्याही न्यायालयातून कंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदीचे कागदपत्रे मागवू शकतात.
5. राष्ट्रपती ज्या ज्या वेळेस आदेश करतील त्या त्या वेळेस त्या बाबीची अंमलबजावणी करणे.

   अनुसू चत जमातीवर परिणाम करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या धोरणात्मक बाबीवर केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी आयोगाशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे.

संदर्भ :-


1. वघे, डॉ. प्रशांत [2019] "आधुनिक राजकीय संकल्पना आ ण धोरण" साईनाथ प्रकाशन नागपूर पान क्र ३३
2. त्रतैव पान क्र ३४
3. एम.लक्ष्मीकांत २०१७ "इं डयन पो लटी" के सागर प्रकाशन पुणे पान क्र ४२१
4. त्रतैव पान क्र. ४२३


संदर्भ ग्रंथ


1. आंबेडकर, डॉ. भी. रा [2012] "भारतातील जाती" अशोका प्रकाशन, नागपूर
2. कांबळे, डॉ. राजेंद्र [2015] "आरक्षण" सुधीर प्रकाशन, वर्धा
3. गायकवाड, प्रदीप [2016] संपादक भारताचे सं वधान समता प्रकाशन, नागपूर
4. वघे, डॉ. प्रशांत [2019] "आधुनिक राजकीय संकल्पना आ ण धोरण" साईनाथ प्रकाशन नागपूर
5. एम.लक्ष्मीकांत २०१७ "इं डयन पो लटी" के सागर प्रकाशन पुणे